R.No. MHHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४७

दि.२९ जानेवारी २०२६,वार: गुरुवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राची अपरिमित हानी राष्ट्रपती, पंतप्रधान आणि लोकसभेकडून भावपूर्ण श्रद्धांजली

नवी दिल्ली, : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या निधनाबद्दल आज देशाच्या राजकीय वर्तुळातून तीव्र शोक व्यक्त करण्यात आला. संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी पवार यांच्या प्रदीर्घ सार्वजनिक कार्याचा गौरव करत त्यांना आदरांजली वाहिली.

**राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची शोकसंवेदना**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, ‘बारामती येथील विमान दुर्घटनेत महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे निधन झाल्याचे वृत्त अत्यंत क्लेशदायक आहे. त्यांचे अकाली जाणे हे राज्याच्या विकासासाठी नुकसानकारक आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीत, विशेषतः सहकारी क्षेत्रात त्यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक आहे. ‘

**पंतप्रधान नरेंद्र मोदींची श्रद्धांजली**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या संदेशात अजित पवार यांच्या संदर्भातील आठवणींना उजाळा दिला. पंतप्रधान म्हणाले,



अजित पवार हे जमिनीशी जोडलेले नेतृत्व होते. महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी सदैव तत्पर असणारे कष्टाळू व्यक्तिमत्व म्हणून त्यांना ओळखले जायचे. त्यांची प्रशासकीय कामांची जाण आणि गरिबांच्या कल्याणाची तळमळ उल्लेखनीय होती. त्यांचे निधन धक्कादायक आहे.

**लोकसभेत शोकप्रस्ताव आणि आदरांजली**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या सत्रात लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अजित पवार यांच्या निधनाबाबत शोकप्रस्ताव मांडला. त्यात अध्यक्षांनी नमूद केले की, अजित पवार १० व्या लोकसभेचे सन्माननीय सदस्य होते. सहा वेळा उपमुख्यमंत्री आणि आठ वेळा विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणावर आपली पकड निर्माण केली होती. सार्वजनिक जीवनातील त्यांची बांधिलकी सदैव स्मरणीय राहील. यानंतर संपूर्ण सभागृहाने दिवंगत नेत्याला श्रद्धांजली अर्पण केली.

## लातूर महापौर व उपमहापौर निवड ९ फेब्रुवारीला

लातूर :- लातूर शहर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदासाठीची निवडणूक सोमवार, ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता होणार आहे. या निवडीसाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांची पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर जितेंद्र पापळकर यांनी २७ जानेवारी रोजी याबाबतचे आदेश निर्गमित केले आहेत. लातूर महापालिकेच्या एकूण ७० जागांपैकी काँग्रेसवंचित बहुजन आघाडीने ४७ जागांवर विजय मिळवत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे.

यावेळी लातूर शहर महानगरपालिकेचे महापौरपद अनुसूचित जातीच्या महिलेसाठी आरक्षित आहे. त्यामुळे सत्ताधारी आघाडीकडून कोणत्या उमेदवाराची निवड होते, याकडे शहराचे लक्ष लागले आहे. निवडणुकीनंतर महापालिकेच्या आगामी कारभाराची दिशा निश्चित होणार असल्याने या निवडीस राजकीयदृष्ट्या विशेष महत्त्व आहे.

## केज येथे अजित(दादा)पवार यांना सर्वपक्षीय भावपूर्ण श्रद्धांजली; व्यापारी वर्गाकडून दुकाने बंद ठेवून शोक व्यक्त!

केज/प्रतिनिधी-केज येथील छत्रपती




शिवाजी चौक येथे अजित(दादा)पवार यांना सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली तर केज येथील व्यापारी वर्गाकडून दुकाने बंद ठेवून शोक व्यक्त केला.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित (दादा) पवार यांच्या अपघाती निधनाची माहिती मिळताच केज तालुका सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केज बंदचे आवाहन केले. या आवाहनाला प्रतिसाद देत व्यापारी वर्गाकडून दुकाने बंद ठेवून शोक व्यक्त करण्यात आला.

बुधवार रोजीची सकाळ ही महाराष्ट्रासाठी दुःखाचा दिवसच ठरली, राज्याचे मुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित दादा पवार यांचा बारामती जवळ विमान दुर्घटनेत मृत्यू झाल्याची बातमी कळताच केज तालुका सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केज बंदचे आव्हान केले असता व्यापाऱ्यांनी लागलीच आपापली दुकाने बंद करण्यास सुरुवात केली. थोड्याच वेळात केजची संपूर्ण बाजारपेठ बंद झाली. व्यापारी वर्गाने दिवसभरासाठी बाजारपेठ बंद ठेवत केज मधील छोटे मोठे व्यावसायिक व व्यापारी बांधवांनी आपापले दुकाने बंद ठेवून सर्वपक्षीय आणि संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

### राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर

मुंबई,: राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क मंत्री अजित आशाताई अनंतराव पवार यांचे आज दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी दुःखद निधन झाले आहे. यामुळे महाराष्ट्रात २८ ते ३० जानेवारी २०२६ या तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत, असे सामान्य प्रशासन विभाग (राजशिष्टाचार) विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

या तीन दिवसांच्या कालावधीत महाराष्ट्रातील ज्या इमारतींवर नियमितपणे राष्ट्रध्वज फडकविण्यात येतो, त्या सर्व ठिकाणी राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात येईल. तसेच या कालावधीत कोणतेही शासकीय मनोरंजन कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुःखद निधनामुळे बुधवार, दिनांक २८ जानेवारी २०२६ रोजी राज्यातील सर्व राज्य शासकीय कार्यालये बंद राहतील, असे कळविण्यात आले आहे

## उमद्या आणि संवेदनशील माणसाला पारखे

सांगली (जि. मा. का.) : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा विमान अपघातात मृत्यू झाल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. हे न कळणारे आणि न पचणारे सत्य असून, अशा उमद्या आणि संवेदनशील माणसाला पारखे झालो आहे, अशा शब्दात राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री तथा सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या घटनेवर तीव्र दुःख व्यक्त करत, उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

इतक्या उमद्या आणि संवेदनशील माणसाचे अचानक जाणे मन मान्य करायला तयार नाही. कालच आपण एकत्र होतो, आज त्यांचे अचानक जाणे हा भास आहे की स्वप्न असा प्रश्न पडावा, असे सांगून पालकमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, अजित पवार हे प्रशासनावर पकड असलेला ‘अभ्यासू’ नेता होते. गेल्या ३५ वर्षांत आमदार, खासदार, उपमुख्यमंत्री आणि विरोधी पक्षनेता अशा सर्व भूमिका त्यांनी समर्थपणे पेलल्या. कुठल्याही विषयाचे आकलन करून घेण्याची त्यांची वृत्ती अफाट होती. या कठीण काळात आम्ही सर्वजण पवार कुटुंबाच्या पाठीशी आहोत, अशा शब्दात पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## प्रतिक्रिया

आजचा दिवस अतिशय दुःखद बातमीने सुरू झाला महाराष्ट्राच्या राजकारणात प्रभाव असणारे, प्रशासनावर भक्कम पकड असणारे नेते रोख ठोक असणारे मात्र करणारा नेता म्हणून होती मात्र आज दादांच्या पाटील कुटुंबाला मोठा आणि पवार परिवाराचे बातमी अत्यंत वेदनादायी राजकारणात एकमेव नेता ते पहाटे ५ वाजल्यापासून बिनधास्त, निर्भीड, कणखर आणि भक्कमपणे पाठिंबा दादा म्हणून त्यांची राज्यात



ज्यांनी जवळजवळ राज्याच्या राजकारणात आणि आपल्या स्वभावाने तेवढ्याच ताकदीने काम अजित दादांची ओळख अकाली जाण्याने आम्हा धक्का बसला आहे आमचे कौटुंबिक स्नेह होते ही आहे....महाराष्ट्राच्या अजित दादा असे होते की आपल्या कामाला लागायचे. आणि योग्य कामास वेळेत देणारे आणि स्पष्ट बोलणारे ओळख होती. ४ दशकांहून अधिक काळ आपला ठसा कायम ठेवला. योग्य नियोजन, प्रशासनावर पकड, मिश्किल स्वभाव पण कामाच्या बाबतीत कठोर; अस बरंच काही... कायम आपल्या कामात व्यस्त असणारा धुरंधर असा नेता गेला!!सद्या दादा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असल्याने बीड च्या बाबतीत अनेक विषयांवर दादासोबत चर्चा व्हायची बीड साठी सकारात्मक पद्धतीने अजित दादा सहकार्ये करत होते. कधी नव्हे ते बीड जिल्ह्याने पहाटे ६ वाजताची उद्घाटने, अचानक शासकीय रुग्णालयात भेट असे अनोखे अनुभव दादांच्या माध्यमातून जिल्ह्याने अनुभवली असा सर्वांना सोबत घेऊन चालणारा व जनतेला आणि कामाला प्राधान्य देणारा हा नेता होता आणि ही उणीव कायम राहील.

अजित पवारांशिवाय महाराष्ट्राचं राजकारण आणि समाजकारण बेचव असेल....

दादांना भावपूर्ण श्रद्धांजली!!

**- सौ.रजनी पाटील**

**- (खासदार राज्यसभा)**

## महाराष्ट्राची तनु भान देशातील ‘सर्वोत्कृष्ट कॅडेट’ पंतप्रधान मोदींच्या हस्ते सुवर्ण पदकाने सन्मानित

नवी दिल्ली, :प्रजासत्ताक दिनाच्या परेडनंतर राजधानी दिल्लीतील करिअप्पा मैदानावर पार पडलेल्या एनसीसी रॅलीमध्ये महाराष्ट्राच्या कन्येने आपल्या अद्वितीय कर्तृत्वाचा झेंडा फडकवला आहे. महाराष्ट्र संचालनालयाची ज्युनिअर अंडर ऑफिसर तनु भान हिने आर्मी विंगमधून (सीनियर विंग) देशातील ‘सर्वोत्कृष्ट कॅडेट’ (इर्शीं उरवर्शी) हा सर्वोच्च बहुमान प्राप्त केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज एका दिमाखदार सोहळ्यात तनु भान हिला सुवर्ण पदक आणि मानाची ‘केन’ देऊन गौरविण्यात आले. यावेळी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि एनसीसीचे महासंचालक लेफ्टिनेंट जनरल वीरेंद्र वत्स यांची विशेष उपस्थिती होती.



देशभरातील १७ संचालनालयांमधील २० लाख कॅडेट्सच्या कडव्या स्पर्धेत, तनुने आपल्या अद्वितीय शिस्तीच्या आणि अष्टपैलू कौशल्याच्या जोरावर हे ऐतिहासिक यश खेचून आणले. ‘राष्ट्र प्रथम कर्तव्यनिष्ठ युवा’ या ब्रीदवाक्याला सार्थ ठरवत, तिने प्रशिक्षणातील सर्व कठीण टप्पे यशस्वीपणे पार करत देशात प्रथम क्रमांक पटकावला.

या प्रसंगी कॅडेट्सना संबोधित करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी तरुणांच्या राष्ट्रभक्तीचा गौरव केला. पंतप्रधान म्हणाले की, आज समोर असलेले हे तरुण केवळ गणवेशातील कॅडेट्स नसून, ते ‘विकसित भारत’चे निर्माते आहेत. तुमचे परिश्रम, त्याग आणि अनुशासन हेच देशाला प्रगतीपथावर नेणारे मुख्य आधारस्तंभ आहेत. ‘राष्ट्र प्रथम कर्तव्यनिष्ठ युवा’ या संकल्पनेचा उल्लेख करत त्यांनी तनु भान आणि इतर विजेत्यांचे विशेष कौतुक केले. ही वचनबद्धता देशाला उज्ज्वल भविष्याकडे नेईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## संपादकीय...

### उपमुख्यमंत्री अजितदादा पवार : धडाकेबाज नेतृत्वाची भरून न निघणारी पोकळी

महाराष्ट्राच्या राजकारणात काही नेते केवळ पदांमुळे ओळखले जात नाहीत, तर त्यांच्या निर्णयक्षमतेमुळे, राजकीय धाडसामुळे आणि प्रशासकीय पकडीमुळे ओळखले जातात. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अशाच प्रकारचे नेतृत्व होते. आज राज्याच्या सत्ताकेंद्रातून त्यांची सक्रिय, निर्णायक भूमिका दूर झाल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी व्यक्तीची नसून, ती निर्णय घेण्याच्या धाडसाची, प्रशासकीय वेगाची आणि राजकीय स्पष्टतेची आहे.

अजित पवार हे लोकप्रियतेच्या राजकारणाचे प्रतीक कधीच नव्हते. त्यांनी भावनिक भाषणे, लोकानुरंजन किंवा प्रतिमानिर्मिती यापेक्षा काम, नियंत्रण आणि निर्णय यांवर भर दिला. सहकार क्षेत्र असो, जलसिंचनाचे मोठे प्रकल्प असोत किंवा अर्थकारणातील कठोर निर्णयत्यांची भूमिका नेहमी ठाम राहिली. त्यामुळे समर्थकांसाठी ते विकासाभिमुख आणि कार्यक्षम नेते होते, तर विरोधकांसाठी सत्ताकेंद्री आणि कठोर प्रशासक. मात्र, महाराष्ट्राच्या राजकारणावर त्यांच्या प्रभावाबाबत कोणताही दुमत असू शकत नाही.राजकीय गणिते अचूक मांडणे आणि योग्य वेळी निर्णायक पाऊल उचलणे, ही अजित पवारांची सर्वात मोठी ताकद होती. अनेक सरकारांचे भवितव्य त्यांच्या भूमिकेवर अवलंबून राहिले. सत्ता असो किंवा विरोध, अजित पवार हे कायम चर्चेच्या केंद्रस्थानी राहिले. त्यामुळे आज त्यांच्या अनुपस्थितीने केवळ एक पद रिकामे झालेले नाही, तर निर्णयप्रक्रियेतील एक महत्त्वाचा आधारस्तंभ ढासळला आहे. त्यांची कार्यशैली वादग्रस्त ठरली, हे वास्तव नाकारता येत नाही. थेट भाषा, कधी कधी असंवेदनशील वाटणारी वक्तव्ये आणि कठोर राजकीय भूमिका यामुळे त्यांच्यावर सातत्याने टीका झाली. पण लोकशाही व्यवस्थेत केवळ सौम्य भाषा पुरेशी ठरत नाही; अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. ते निर्णय घेण्याची तयारी अजित पवारांकडे होती. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाचे मूल्यमापन करताना भावनिक निकषांपेक्षा परिणामकारकतेचा विचार करणे आवश्यक आहे.आज महाराष्ट्राच्या राजकारणासमोर एक मूलभूत प्रश्न उभा राहतोधडाकेबाज निर्णय घेणारे नेतृत्व कमी होत आहे का? प्रशासन चालवण्यासाठी केवळ समन्वय, चर्चा आणि प्रक्रियेवर भर देणे पुरेसे नसते; वेळप्रसंगी कठोर, अप्रिय पण आवश्यक निर्णय घ्यावे लागतात. अजित पवार हे असे निर्णय घेणाऱ्या मोजक्या नेत्यांपैकी एक होते. त्यामुळे त्यांच्या जागी येणाऱ्या नेतृत्वासमोर अपेक्षांचा डोंगर उभा राहणार आहे.राजकीय पातळीवरही या बदलाचे परिणाम दूरगामी असतील. सत्ता संतुलन, पक्षांतर्गत समीकरणे आणि धोरणात्मक निर्णय नव्याने आकार घेतील. या प्रक्रियेत स्थैर्य टिकवणे हे सरकारपुढील मोठे आव्हान असेल. कारण अजित पवार हे केवळ एक व्यक्ती नव्हते, तर अनेक निर्णयप्रवाहांचे केंद्र होते. त्या केंद्राच्या अभावामुळे निर्माण होणारी अस्थिरता सहजपणे हाताळता येणार नाही.लोकशाहीत व्यक्ती येतात-जातात, पण काही व्यक्तींचा प्रभाव दीर्घकाळ टिकतो. अजित पवार यांचे नेतृत्वही त्याच प्रकारचे होते. आज ते सक्रिय सत्ताकेंद्रात नसले, तरी त्यांनी निर्माण केलेली प्रशासकीय संस्कृती, निर्णयांची शैली आणि राजकीय धार सहज विसरता येणारी नाही. महाराष्ट्राने आज एखादा चेहरा नव्हे, तर धडाकेबाज निर्णयक्षमता आणि प्रभावी नेतृत्वाचा एक महत्त्वाचा अध्याय गमावल्याची भावना व्यक्त केली आहे.

ही पोकळी कधीतरी भरून निघेलच. पण तोपर्यंत महाराष्ट्राच्या राजकारणाला संयम, स्पष्ट दिशा आणि जबाबदार, निर्णयक्षम नेतृत्वाची अधिक गरज भासणार आहे. अजितदादा पवार यांचे राजकारण आवडो किंवा न आवडोत्याकडे दुर्लक्ष करून महाराष्ट्राचा राजकीय वर्तमान आणि भविष्य समजून घेता येणार नाही, हेच या क्षणाचे खरे वास्तव आहे.

# संविधान तुमची ढाल आहे.पण ती सांभाळण्याची ताकद तुमच्यात असली पाहिजे.

माझ्या प्रिय देश बांधवानो,शोषित आणि वंचित समुदायातील माझ्या बंधू आणि भगिनींनो आणि या नवजात राष्ट्राच्या नागरिकांनो जागे व्हा! सविधान, ही तुमची ढाल आहे पण ती धरून ठेवण्याची ताकद तुम्ही एकवटली पाहिजे. आज मी इथे उभा असताना माझ्या हातात असलेले हे भारतीय संविधान केवळ पानाचा गठ्ठा नाही. ते माझ्या घामाने,माझ्या रक्ताने, माझ्या निद्रानाशाच्या रात्रीने आणि हजार वर्षापासून माझ्या समाजाच्या अश्रूचे सार आहे.आज माझे हृदय आनंदाने नाही तर चिंता आणि जबाबदारीच्या भावनेने देखील भरलेले आहे.मी तुम्हाला खुश करण्यासाठी गोड शब्द बोलणार नाही. आज मी तुम्हाला झोपी जाण्यासाठी लोरी म्हणायला आलो नाही .उलट तुम्हाला जागे करायला आलो आहे. कारण आपल्या समाजाने शतकानुशतकेची झोप अनुभवली आहे. त्याची किंमत आपण आपल्या गुलामगिरीतून चुकवली आहे. भारतीय संविधान तयार करण्याच्या वेदना संघर्षाशी आज आपण आनंदी आहोत की आपल्याला हक्क मिळाले आहेत आपण आता मुक्त आहोत याचे कौतुक करणार आहोत पण स्वातंत्र्याचा हा दस्तऐवज,समानतेचा दस्तऐवज तयार करण्यासाठी तयार करण्यासाठी मला कोणत्या आगीतून जावे लागले हे तुम्हाला माहित आहे का ?

जेव्हा मी संविधान सभेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून निवडून आलो तेव्हा मी ती जबाबदारी स्वीकारली. पण मला माहित होते.तो काट्यांचा मुकुट होता मी आजारी होतो. माझे शरीर कमकुवत होत होते. डॉक्टरांनी मला विश्रांती घ्यायचा सल्ला दिला. माझी दृष्टी कमकुवत होत होती. मधुमेह माझ्या शरीराला आतून पोकळ करत होता .पण माझ्यासमोर फक्त तुमची प्रतिमा होती. ते म्हणजे गावातील विहिरीचे पाणी पिण्यासाठी मारहाण झालेल्या त्या पिढीत व्यक्तीची, जिच्या मुलाला वर्गाबाहेर अभ्यासासाठी बसवण्यात आले होते.मी रात्रभर जागा राहतो जेव्हा संपूर्ण दिल्ली झोपली होती .तेव्हा माझा दिवा जळत राही.

*माझ्या मनात फक्त एकच भीती होती. जर मी आज चूक केली, जर आज माझी लेखणी थांबली किंवा आज मी एक चुकीचा शब्द लिहिला तर माझ्या भावी पिढ्या पुन्हा एकदा गुलामगिरीच्या साखळी दंडात जखडल्या जातील.

माझा अपमान झाला .मला देशद्रोही म्हटले गेले. मी केलेल्या प्रत्येक प्रस्तावावर बोटे उचलली गेली.मला प्रत्येक पावलावर थांबवले गेले.पण मी थांबलो नाही. का? कारण मला माहित होते मी एकटा नाही.माझ्या लेखणीने लाखो आवाजहीन लोकांचा आवाज उचलला.आज तुम्हाला समान हक्क देणारे हे सविधान. मी माझ्या आयुष्यातील काही वर्ष बलिदान देऊन तयार केले. तुम्ही डोके वर करून चालावे म्हणून मी माझे आरोग्य बलिदान दिले. आता हे संविधान काय आहे त्याचा तुमच्यासाठी काय अर्थ आहे ते जाणून घ्या .काळजीपूर्वक ऐका आणि ते तुमच्या हृदयात जपून ठेवा.

हजारो वर्षापासून या देशात एक वेगळा कायदा प्रचलित होता मनू चा कायदा. एक असा कायदा ज्यामध्ये म्हटले होते ,की ,सर्व माणसे समान नाही .काही जण डोक्यातून जन्माला आले .काही जण पायातून जन्माला आले. काहींना शिक्षण घेण्याचा अधिकार होता तर काहींना फक्त सेवा करण्याचा. मी तो कायदा जाळून टाकला आहे आणि तुम्हाला नवीन कायदा दिला आहे ते हे नवीन संविधान दिला आहे. हे संविधान काय करते हे तुम्हाला प्रजेपासून नागरिक बनवते. काल पर्यंत तुम्ही राजाचे प्रजा होता. जमीनदाराचे गुलाम होता. आज पासून संविधानाच्या अंमलबजावणीमुळे तुम्ही या देशाचे मालक आहात.समानतेचा अधिकार आता तुम्हाला मिळाला आहे आता कोणी राजा असो की गरीब असो कोणी ब्राह्मण असो की शूद्र असो कायद्याच्या दृष्टीने सर्व समान आहेत गरीब व्यक्तीला मिळणारी शिक्षा श्रीमंत व्यक्तीसारखीच आहे मतदानाचा अधिकार हे माझे सर्वात मोठे शस्त्र आहे जे मी तुम्हाला दिले आहे.

राणीच्या पोटातून राजाचा जन्म होणे हे युग संपल आहे. आता राजा तुम्ही निवडलेला असेल.तुमचे एक मत देशाच्या पंतप्रधानाच्या मता इतकेच आहे. ते कधीही विकू नका.हे प्रतिष्ठेचे जीवन. हे संविधान फक्त तुम्हाला अन्न वस्त्र देत नाही तर ते तुम्हाला प्रतिष्ठा आणि आदर देते आता कोणी तुम्हाला अस्पृश्य म्हणून तुमचा अपमान करू शकत नाही.जर कोणी असे केले तर संविधान तुमच्या हातातील ढाल आहे. त्याच्या साह्याने तुम्ही कायदेशीर लढा ही लढू शकता. मी या संविधानात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्वाचे बीज पेरले आहे लक्षात ठेवा समते शिवाय स्वातंत्र अपूर्ण आहे आणि बंधुत्वाशिवाय दोन्ही निरूपयोगी आहेत. मी तुम्हाला असे घर बांधले आहे ज्याचा पाया न्यायावर आहे आता हे घर सजवणे व राखणे तुमचे काम आहे.आजच्या भाषणाचा सर्वात मोठा भाग आहे. मी तुम्हाला एक इशारा देऊ इच्छितो. संविधान किती चांगले असले तरी त्याचे व्यवस्थापन करणारी लोक वाईट असले तर संविधान शेवटी वाईट सिद्ध होईल. आणि संविधान कितीही वाईट असले तरी त्याचे व्यवस्थापन करणारी लोक चांगले असले तर ते चांगले सिद्ध होईल. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुढे म्हणतात मला तीन धोक्यांची भीती वाटते की तुम्ही त्यांच्यापासून सावध राहिले पाहिजे.

पहिला धोका म्हणजे राजकीय लोकशाही विरुद्ध सामाजिक लोकशाही. २६ जानेवारी १९५० रोजी आपण विरोधीभासी जीवनात प्रवेश करू. राजकारणात आपल्याला समानता मिळेल.एक व्यक्ती एक मत.पण सामाजिक आणि आर्थिक जीवनात अजूनही असमानता आहे. श्रीमंत राजवाड्यात राहतात.तर गरीब झोपडया मध्ये राहतात.उच्च जाती आणि कनिष्ठ जातीमधील भेद अजूनही अस्तित्वात आहे.जर आपणही सामाजिक असमानता लवकरच दूर केली नाही तर ज्यांना याचा त्रास सहन करावा लागतो ते एक दिवस आपण इतक्या कष्टाने बांधलेल्या राजकीय लोकशाहीच्या रचनेलाच उडवून देतील. म्हणून फक्त मतदान करून समाधान मानू नका .समाजात बंधूंना पुन्हा संचयित होईपर्यंत लढा चालू ठेवला पाहिजे

दुसरा धोका म्हणजे भक्ती आणि अंधश्रद्धा. ही भारताची सर्वात मोठी कमकुवता आहे.धर्मात भक्ती हा आत्मामुक्तीचा मार्ग असू शकतो पण राजकारणात भक्ती हा अधोगती आणि हुकूमशाहीचा थेट मार्ग आहे.कोणत्याही नेत्याला, अगदी मला ही इतके महान बनवू नका, की तुम्ही तुमच्या मनाचा वापर करणे थांबवा.कोणताही माणूस इतका महान नाही. आपण त्याच्यासाठी आपले स्वातंत्र्य गहाण ठेवावे जर तुम्ही नेत्यांची पूजा केली तर तुम्ही पुन्हा स्वतः ला गुलाम कराल. प्रश्न विचारायला शिका .तुम्ही तुमची बुद्धी वापरा. नायक पूजा टाळा .कारण ती लोकशाहीचा नाश करते.

तिसरा धोका म्हणजे तुमचे मार्ग सोडू नका जोपर्यंत आपल्याकडे संविधान नव्हते तेव्हा सत्याग्रह केला.रस्ते अडवले. कायदे मोडले.ते सर्व ठीक होते.पण आता आपल्याकडे संविधान असल्याने आपण अराजकतेचे व्याकरण संपवले पाहिजे .आपला मुद्दा मांडण्यासाठी हिंसाचाराचा अवलंब करू नका. रस्ते अडवू नका संविधानिक मार्गाने लढायला शिका. न्यायालयाचे दरवाजे ठोठवा. संसदेत आवाज उठवा. जर तुम्ही कायदा स्वतः च्या हातात घेतला तर तुमचे रक्षण करणाऱ्या संविधानाला कमकुवत कराल.

भविष्याबद्दल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात मी माझे काम केले आहे.मी तुम्हाला चावी दिली आहे. ज्यामुळे तुम्ही तुमच्या नशिबाचे कुलूप उघडू शकता पण लक्षात ठेवा.तुम्ही स्वतः दार उघडून आज जावे.मी आता म्हातारा होत आहे. माझे शरीर थकत आहे. मी कदाचित तुमच्या मध्ये जास्त काळ राहणार नाही पण या गोष्टीचा मला दिलासा आहे कि, मी शतकानुतके चिखलात अडकलेला रथ योग्यरीत्या उभा केलाय तो बाहेर काढून फक्त रस्त्यावर ठेवला आहे आता तो रथ पुढे नेण्याची जबाबदारी तुमची आहे. जर तुम्ही तो पुढे नेऊ शकत नसाल तर मागे जाऊ देऊ नका. शिक्षित व्हा. फक्त पदवी मिळवण्यासाठी अभ्यास करू नका तर बरोबर आणि चूक ओळखण्यासाठी सक्षम व्हा. एकजूट राहा.जातीमध्ये विभागलेले राहू नका .तुमची ताकद तुमच्या एकतेत आहे.जर तुम्ही विखुरलात तर तुम्हाला पुन्हा चिरडले जाईल. लढा. अन्याया विरुद्ध कधी गप्प बसू नका. हे संविधान तुम्हाला सिंह बनवेल.आता मेंढ्या सारखे रडणे थांबवा .तुमच्यात या देशाचा शासक समुदाय बनण्याची क्षमता आहे. बाबासाहेब शेवटी म्हणतात आज हसा कारण तुमच्या पायातील बेड्या तुटल्या आहे.आज आनंदी राहा कारण आता तुमची मुले कोणासमोर भीक मागणार नाहीत. तर त्यांच्या डोळ्यात पाहतील. आज अभिमान बाळगा कारण तुम्ही जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे संविधान तुमच्या हातात धरले आहे पण माझा इशारा लक्षात ठेवा. हक्क ही अशी गोष्ट नाही जी कोणी तुम्हाला दे.ते हक्क अशी गोष्ट आहे की कोणीही तुमच्याकडून हिरावून घेऊ शकत नाही. तुमच्या स्वातंत्र्याचे रक्षण तुमच्या जीवापेक्षाही जास्त करा. मी तुम्हाला एक प्रबुद्ध भारताचे स्वप्न देऊन जात आहे हे स्वप्न पूर्ण कराल का ? संविधानाचे रक्षण कराल का? उठा! जागे व्हा! तुमची गमावलेली प्रतिष्ठा पूर्णपणे परत मुळे मिळेपर्यंत थांबू नका

**संजय सखाराम पवार**
**मो.न.९१३७४४०३४०**
**खांडोत्री तालुका चिपळूण जिल्हा रत्नागिरी**

# प्रजासत्ताक दिन म्हणजेच स्वतंत्र भारताची नियमावली.

२६ जानेवारी संविधानाचा व नियमांचा आधारस्तंभ आहे.१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु स्वातंत्र्यानंतर संविधान, देशाची नियमावली असने गरजेचे असते.कारण कोणत्याही कार्याकरीता पुढे पाऊल टाकण्यास कायद्याच बंधन असने आवश्यक आहे.२६ जानेवारी १९५० रोजी देशाची राज्यघटना लागु झाली.त्यानिमित्याने भारतातील प्रत्येक नागरिक मोठ्या उत्साहाने प्रजासत्ताक दिन साजरा करीत असतो.कारण प्रजासत्ताक म्हणजे लोकांव्दारे लोकांसाठी प्रस्थापित केलेले शासन. भारतात जात,धर्म, पंथ,वंश, गरीब-श्रीमंत, व्देष या संपूर्ण गोष्टी बाजूला ठेवून गुण्या-गोविंदाने प्रजासत्ताक दिवस वेगवेगळ्या संस्कृतीच्या माध्यमातून मोठ्या उत्साहाने साजरा करतात. २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांची लॉर्ड माउंट बॅटन(गव्हर्नर जनरल) यांच्या जागी भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून निवड झाली.२६ जानेवारीच्या निमित्ताने दरवर्षी राष्ट्रपतींच्या हस्ते दिल्लीतील राजपथावर राष्ट्रध्वज फडकवला जातो.आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत.मुख्यत्वे करून २६ जानेवारीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेली राज्यघटना लागु करण्यात आली. त्यामुळे स्वतंत्र भारतासाठी हा मोठा आणि गौरवाचा दिवस मानल्या जातो.भारताला स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झाली असली तरी आजही देशात आपल्याला गुन्हेगारी, भ्रष्टाचार, बँक घोटाळे,झुंड बळी, जातीयवाद, हिंसाचार,यांच्याशी आजही आपण लढतोय ही स्वतंत्र भारतासाठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.अशा गुन्ह्या विरूद्ध सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी एकत्र येण्याची नितांत गरज आहे. कारण देश स्वतंत्र करण्यासाठी महात्मा गांधी,भगतसिंग, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, झाशीची राणी, लाला लजपतराय, लोकमान्य टिळक, चंद्रशेखर आझाद, हजारो क्रांतिकारक, मवाळवादी -जहालवादी, थोर महात्मे इत्यादीसह लाखो स्वतंत्र शुरविरांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. तेव्हाच १५ ऑगस्ट १९४७ हा दिवस उदयास आला. भारताच्या थोर महात्म्यांना भारत स्वतंत्र करण्यासाठी दोन नद्यांचा सहारा घ्यावा लागला व त्या दोन नद्यांचा उगम म्हणजे एक मवाळवादी तर दुसरी जहालवालवादी यांच्या संगमानेच भारतीय स्वातंत्र्यलढा उभा झाला. याकरिता आपल्याला १५ ऑगस्ट१९४७ उजाडण्यासाठी तब्बल १५० वर्षे वाट पाहावी लागली.१५० वर्षांच्या काळातील स्वतंत्र विरांचे बलीदान व्यर्थ जावु नये व त्यांचा सन्मान व्हावा या उद्देशाने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना अस्तित्वात आणली.यात मुख्यत्वेकरून डॉ बाबासाहेब आंबेडकर, डॉ राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल,पंडित जवाहरलाल नेहरूसह अनेक थोर महात्म्यांचा सिंहाचा वाटा आहे. परंतु दु:खाची गोष्ट म्हणजे गेल्या ३० वर्षांपासून देशात भ्रष्टाचार, करोडोचे घोटाळे, बलात्कार, गुन्हेगारी,निवडणुकांमध्ये जातीयवाद याला मोठ्या प्रमाणात उत आल्याचे पहायला मिळते.ही शहिद विरांच्याप्रती अत्यंत दु:खद व चिंताजनक बाब आहे. आपल्या पुर्वजांनी व देशाच्या स्वतंत्र संग्राम सेनानींनी आणि बहादुर विरांनी घर-दार, परीवार या संपूर्ण गोष्टी बाजूला सारून व त्याग करून स्वातंत्र्याच्या अग्नी कुंडात उडी घेतली व लाखोंच्या संख्येने बलीदान दिले. परंतु आपली शोकांतिकाच म्हणावी लागेल की आपण भारत स्वतंत्र होऊन ७८ व्या वर्षीत पदार्पण करीत आहोत तरीही भारतातील भ्रष्टाचार थांबलेला नाही.आज भारतातील राजकीय पुढाऱ्यांजवळ, पुंजीपतीं, वॉलीउडक्षेत्र व भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांजवळ वाममार्गाने कमवीलेली करोडोंची चल-अचल संपत्ती आजही आहे. ही संपत्ती एकत्र केली तर भारताला तब्बल १० वर्षे कोणाही जवळुन कर्ज घ्यावे लागणार नाही व गरीबी आणि महागाई संपुष्टात येवु शकते आणि देश सुजलाम - सुफलाम होण्यास मोठी मदत मिळेल.याकरिता भ्रष्ट अधिकारी व भ्रष्ट राजकीय पुढारी ही देशाला लागलेली कीड आहे ही कीड जळामुळासकट नष्ट व्हायला हवी व यावर आळा बसायला हवा.आज मुठभर राजकीय पुढाऱ्यांनी करोडो रुपयांची चल-अचल संपत्ती डांबुन ठेवल्याने व चलनात नसल्याने देशातील गरीब वर्ग गरीबीच्या खाईत जात आहे तर श्रीमंत वर्ग दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व देशाच्या विकासामध्ये मोठा अडथळा निर्माण होत आहे. यामुळेच देशात महागाई व बेरोजगारी मोठ्या प्रमाणात दिसून येते.भारताचे प्रजासत्ताक दिनाचे ७६ व्या वर्षाचे औचित्य साधून देशातील संपूर्ण भ्रष्टाचाऱ्यावर कठोर कारवाई करून त्यांनी वाममार्गाने कमवीलेला पैसा सरकारने आपल्या तिजोरीत जमा करावा. यामुळे देशाचा विकास, बेरोजगारीची समस्या, महागाई यावर आळा घालण्यासाठी मोठी मदत होईल व देशाचा विकास भरभराटीला येईल.याचे स्वागत आपले पुर्वज,शहीद व स्वतंत्र सेनानी अवश्य करेल व त्यांच्या स्वतंत्र लढ्याला दिलासा अवश्य मिळेल हीच प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने शहिदांना खरी आदरांजली ठरेल. देशात वाढते हवामानातील बदल, प्रदूषण व ग्लोबल वार्मिंगचा धोका पहाता.प्रजासत्तक दिनाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. याकरीता शाळा, कॉलेज, संपूर्ण सरकारी क्षेत्र, राजकीय पुढारी, सामाजिक संघटना यांनी पुढाकार घ्यायला हवा.यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होईल व प्रदूषणावर मात करण्यासाठी मोठी मदत मिळेल. आजच्या दिवशी वृक्षलागवड झाली तर ती अनंतकाळापर्यंत सर्वांच्या हृदयात राहील व लाखो शुरविरांचे दर्शन प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात, फळात व जळामुळात आपल्याला होईल. यामुळे भारतीय शहिदांची व शुरविरांची गाथा अबाध्य आहे.कारण त्यांच्या आशीर्वादानेच आपण आज मोकळा श्वास घेत आहोत.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.**

# संविधानिक मूल्यांचा सन्मान ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी सुदामतीताई वाघ



बीड/प्रतिनिधी-भारतीय प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून तो संविधान, लोकशाही, स्वातंत्र्य आणि समानतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा राष्ट्रीय संकल्पाचा दिवस आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव मिळाली आहे. या संविधानिक मूल्यांचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी असल्याचे मत शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणानंतर आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना प्रतिपादन केले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे नामदेव वाघ, गणेश कदम, रंजित कदम, प्रवीण तोडकर, चंद्रसेन शेंडगे, दिलीप कदम, दादाराव काळे, श्रद्धा कॉम्प्युटरचे संचालक काळे, दिलीप जोगदंड, शैलेश जोगदंड, शालिनी जोगदंड, दत्तात्रय चव्हाण, आत्माराम वाव्हळ सर आदी मान्यवर उपस्थित होते.

बीड शहरालगत असलेल्या शिदोड येथील शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच संस्थेचे संस्थापक सचिव स्व. गोविंदराव वाघ यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थी चि. शिवराज तोडकर व कु. श्रेया कदम यांनी प्रजासत्ताक दिनाच्या महत्त्वावर आपले विचार मांडले. त्यानंतर दहावीमध्ये शिक्षण घेत असलेला विद्यार्थी चि. तानाजी सुभाष काळे याने राष्ट्रीय रायफल/पिस्तोल शूटिंग स्पर्धेत मिळवलेल्या यशाबद्दल त्याचा सत्कार करण्यात आला. तानाजीने २५ मीटर स्टँडर्ड पिस्तोल (सीनियर गट) मध्ये तृतीय क्रमांक (कास्यपदक) तसेच २५ मीटर स्पोर्ट पिस्तोल (ज्युनियर गट) मध्ये द्वितीय क्रमांक (रौप्यपदक) पटकावले असून त्याची आंतरराष्ट्रीय इंडियन टीम ट्रायल्ससाठी निवड झाली आहे. या यशाबद्दल मान्यवरांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

याचप्रसंगी बीड शहरातील एमआयडीसी परिसरातील श्रद्धा कॉम्प्युटर यांच्या वतीने आयोजित सामान्य ज्ञान स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. या स्पर्धेत प्रथम क्रमांक आकाश अंगद मोरे, द्वितीय क्रमांक वैष्णवी अमोल शेंडगे तर तृतीय क्रमांक अमृता बाबू पाखरे यांनी पटकावला. मान्यवरांच्या शुभहस्ते स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन विजेत्यांचे कौतुक करण्यात आले. तसेच शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित क्रीडा स्पर्धेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांनाही बक्षिसे देण्यात आली. यानंतर शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या मुंबई येथील अन्न व नागरी पुरवठा विभागात कार्यरत असलेले शैलेश जोगदंड यांनी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमती सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, भारतीय प्रजासत्ताक दिन हा केवळ उत्सव नसून तो संविधान, लोकशाही, स्वातंत्र्य आणि समानतेच्या मूल्यांची आठवण करून देणारा राष्ट्रीय संकल्पाचा दिवस आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे प्रत्येक नागरिकाला अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव मिळाली आहे. या संविधानिक मूल्यांचा सन्मान राखणे ही प्रत्येक भारतीयाची जबाबदारी आहे.

विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम, संविधाननिष्ठा आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणातूनच सक्षम, जबाबदार आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारी पिढी घडू शकते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची जाणीव ठेवून देशासाठी प्रामाणिकपणे काम करण्याचा संकल्प करावा. लोकशाहीची ताकद ही संविधानात आहे. देशाची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व अबाधित ठेवण्यासाठी आपण सर्वांनी संविधानाच्या मार्गानेच पुढे गेले पाहिजे. प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने सर्व नागरिकांनी राष्ट्र अधिक मजबूत करण्याचा निर्धार करावा असे आवाहन शेवटी श्रीमती सुदामती वाघ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन आत्माराम वाव्हळ सर यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती फाटे, श्रीमती साळुंके, श्रीमती सानप, श्री गुजर सर यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षणप्रेमी नागरिक, विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वसंत प्राथमिक शाळा, केज येथे प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कलागुणांचे पालक, प्रेक्षकांकडून भरभरून कौतुक

केज/प्रतिनिधी-वसंत प्राथमिक शाळा, केज येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.



या कार्यक्रमात शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि पालकांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

सकाळीच शाळेच्या आवारात तिरंगा ध्वज फडकावण्यात आला. मुख्याध्यापकांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले आणि राष्ट्रगानाच्या गायनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला अर्पण केलेले संविधानाची ओळख आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानावर भाषणे दिली. छोट्या मुलांनी देशभक्तीपूर्ण गीते गायली, विद्यार्थ्यांनी 'भारत माता की जय', 'वंदे मातरम', प्रजासत्ताक दिनाचा विजय असो अशा घोषणा देत उत्साह वाढवला.

शाळेतील विद्यार्थ्यांनी प्रभात फेरी दरम्यान सादर केलेल्या कार्यक्रमात देशभक्तीपर नृत्य, टिपरी नृत्य, लेझीम, समूह नृत्य, वैयक्तिक नृत्य आणि एकत्रित गायन यांचा समावेश होता.

सकाळी ध्वजारोहण नंतर भारतीय संविधानाचे महत्त्व' या विषयावर छोटी चर्चा सत्रही घेण्यात आले.

मुख्याध्यापक श्री प्रशांत देशमुख यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, प्रजासत्ताक दिन हा आपल्या लोकशाही मूल्यांचा, एकतेचा आणि संविधानाचा सन्मान करण्याचा दिवस आहे. आमच्या शाळेतील मुलांनी आज दाखवलेला उत्साह पाहून अभिमान वाटतो. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये देशप्रेम,नैतिक मूल्ये, आणि सामाजिक जबाबदारीची भावना वाढते.

शिक्षकांनी मुलांना देशभक्तीची शपथ दिली, वसंत प्रा. शाळेची प्रभात फेरी शहरातील वकील वाडी, प्रशांत नगर,समर्थ नगर, अहील्यानगर, फुले नगर, छत्रपती शिवाजी महाराज चौक, कानडी रोड या ठिकाणी शाळेतील विद्यार्थी यांनी आपले कला कौशल्य दाखवले उपस्थित पालक प्रेक्षकांनी मुलांच्या उत्साहाचे व कलागुणांचे कौतुक केले. तसेच छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने शाळेच्या या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या आहेत.

वसंत प्राथमिक शाळेतील हा उत्सव यशस्वीपणे साजरा झाल्याने परिसरातील इतर शाळांसाठीही आदर्श ठरला आहे.

वसंत प्राथमिक शाळेत प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम व प्रभात फेरी यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत देशमुख, सह. शि. किरण असवले, प्रविण देशमुख, विजय आरकडे, अंगणवाडी सेविका सौ. अंजली हजारे मॅडम,सौ. दिव्या बनसोडे मॅडम तसेच पालक वर्ग यांनी परिश्रम घेतले.

# सामान्याप्रति बांधिलकी आणि कार्यतत्पर अजितदादांची ओळख कायम स्मरणात राहील- आ. रमेशआप्पा कराड



लातूर- तळागाळातील माणसासाठी सातत्याने धडपड करणारे, शिस्तप्रिय, रोखठोक आणि प्रशासनाची जाण असणारे राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दुर्दैवी आक्समिक निधनाने कधीही भरून न निघणारी महाराष्ट्राची मोठी हानी झाली आहे. शिस्त, सामान्याप्रति बांधिलकी अन कार्याप्रति निष्ठा ही दादांची ओळख होती अशी प्रतिक्रिया लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांनी व्यक्त केली.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या जाहीर सभेसाठी अजितदादा पवार हे मुंबईहून बारामतीकडे विमानाने जात होते. यावेळी विमानतळाच्या धावपट्टीवर लँडिंग करताना दुर्दैवी अपघात झाला आणि त्यात अजितदादांचे दुःखद निधन झाले ही घटना अत्यंत दुर्दैवी असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, दिवसाचे १६-१७ तास सर्वसामान्य जनतेसाठी उपलब्ध राहून त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम अजितदादा पवार यांनी केले असून सातत्याने गेली ३ दशके महाराष्ट्र राज्याच्या राजकीय-सामाजिक जीवनावर प्रभाव टाकणाऱ्या या नेतृत्वाकडे असलेली सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी थक्क करणारी आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष असलेल्या अजितदादा पवार यांनी सर्वाधिक वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिले असून ते आजतागायत उपमुख्यमंत्री होते. महाराष्ट्राच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान असून लातूर ग्रामिण मतदार संघासाठी भरीव निधी देण्यासाठी त्यांचे सातत्याने वेळोवेळी सहकार्य लाभले. दादा शेवटच्या श्वासांपर्यंत कार्यरत राहीले. त्यांच्या निधनाची बातमी अंतकरणाला चटका लावणारी आहे. त्यांना व त्यांच्यासमवेत विमानात असलेल्यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करून हे दुःख पेलण्याची पवार कुटुंबीयांना परमेश्वराने ताकद देवो असे आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखविले.

# महाराष्ट्रातील बौद्ध समाज : लेखमाला

संख्येपासून संघटनाकडे दिशा, प्रक्रिया आणि नेतृत्वनिर्मिती

पहिल्या लेखात आपण एक वास्तव प्रामाणिकपणे मांडले महाराष्ट्रातील बौद्ध समाजाकडे संख्या आहे, इतिहास आहे, वैचारिक परंपरा आहे; तरीही ती संख्या संघटित राजकीय ताकद म्हणून उभी राहत नाही. हा लेख त्या वास्तवावर चर्चा करण्यासाठी नव्हे, तर त्या वास्तवातून पुढे जाण्याचा मार्ग शोधण्यासाठी आहे. कारण समस्या ओळखणे ही पहिली पायरी असते; पण उपायांपर्यंत पोहोचणे आणि ते सातत्याने राबवणे ही खरी जबाबदारी असते.

१. संघटन म्हणजे घोषणा नव्हे ती एक सतत चालणारी प्रक्रिया आहे

संघटन म्हणजे एखादी घोषणा, एखादा मोर्चा, एखादी रॅली, एखादा परिसंवाद एखादी चिंतन किंवा धम्म परिषद किंवा एखादा मोठा कार्यक्रम नाही. हे सगळे संघटनाचे भाग असू शकतात; पण ते संघटन नाही. संघटन म्हणजे सातत्य!

नियमित बैठक, स्पष्ट जबाबदाऱ्या, स्थानिक पातळीवरील काम, आणि दीर्घकालीन उद्दिष्टांची जाणीव यांतून संघटन आकार घेत असते. कार्यक्रम एक दिवसाचे असतात; संघटन मात्र रोजचे असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट शब्दांत सांगितले होते

संघटित राहा! संघटनाशिवाय कोणताही समाज आपले हित साधू शकत नाही.आज बौद्ध समाजात जयंती, दीक्षा दिन, धम्म परिषद, परिसंवाद, रॅली, मोर्चे यांना मोठी उपस्थिती दिसते. लाखो लोक एकत्र येतात. ही भावनिक ताकद आहे. पण प्रश्न असा आहे की या भावनेचे संघटनात रूपांतर का होत नाही? कार्यक्रम संपल्यानंतर पुढे काय करायचे, याची योजना नसते. परिणामी प्रत्येक कार्यक्रम स्वतंत्र राहतो; एकमेकांशी जोडला जात नाही. संघटनाची खरी सुरुवात तिथून होते, जिथे कार्यक्रमानंतर काम सुरू होते.

२. धम्म आणि संघटन : केवळ भावनेपुरते मर्यादित का?

संघ ही संकल्पना बुद्ध विचारधारेचा केंद्रबिंदू आहे. तथागत बुद्धांनी समाजपरिवर्तनासाठी संघ उभा केला. संघ म्हणजे केवळ धार्मिक रचना नव्हे; तो शिस्त, समता, संवाद आणि सामूहिक निर्णयप्रक्रियेचा प्रयोग होता.आज बौद्ध समाजात मोठ्या प्रमाणावर धम्म परिषदा होत आहेत. समाज आर्थिक आणि भावनिक सहभाग देत आहे, ही निश्चितच समाधानाची बाब आहे. मात्र प्रश्न असा आहे या परिषदांतून दीर्घकालीन संघटनात्मक बांधणी का होत नाही?धम्मभावनेतून दिलेले दान, केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता, समाज संघटन, अभ्यास, प्रशिक्षण आणि धम्मप्रसारासाठी वापरले गेले पाहिजे. काही सन्माननीय अपवाद वगळता, परिषदांपलीकडे टिकणारी धम्म चळवळ दिसत नाही, हे वास्तव स्वीकारावे लागेल. सम्राट असोकांच्या काळात धम्माला राजाश्रय मिळाला, कारण धम्म आणि समाजकारण यांचे एकत्रीकरण झाले. विहार, लेणी, सांस्कृतिक केंद्रे उभी राहिली. इतिहास आपल्याला सांगतो धम्म, विचार आणि संघटन एकत्र आले, तरच परिवर्तन घडते.

३. नेतृत्वनिर्मिती : व्यक्ती नव्हे, प्रक्रिया

बौद्ध समाजाला नेते नाहीत असे नाही. पण नेतृत्व घडवणारी सातत्यपूर्ण आणि पारदर्शक प्रक्रिया कमी पडते. त्यामुळे प्रत्येक वेळी प्रश्न 'नेता कोण?' असा विचारला जातो; 'नेतृत्व कसे घडते?' हा प्रश्न दुर्लक्षित राहतो. नेतृत्व म्हणजे केवळ पुढे उभे राहणे नाही. नेतृत्व म्हणजे ऐकण्याची क्षमता, संयम, सातत्य आणि संघटनेत काम करून घेण्याची शिस्त; स्वतःच्या प्रसिद्धीपेक्षा संघटनेची वाढ महत्त्वाची मानणे. तसेच,स्वतः नेते राहण्यापेक्षा इतरांना सक्षम बनवणे पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे, आणि उद्याचे सक्षम, विचारशील आणि संघटनेला टिकवणारे जबाबदार कार्यकर्ते घडवणे. बाबासाहेब आंबेडकर हे याचे सर्वोत्तम उदाहरण होते. त्यांनी विचार, संघटन आणि राजकारण यांचे सुसंगत एकत्रीकरण केले. आज त्यांच्या नावाचा जयघोष मोठ्या प्रमाणात होतो; पण त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास त्या प्रमाणात होताना दिसत नाही. खरे तर बाबासाहेबांनी समाजाला केवळ दिशा दाखवली नाही, तर परिवर्तनासाठी स्पष्ट असा रोड मॅप दिला आहे. त्या रोड मॅपवर प्रामाणिकपणे चालण्याची तयारी असेल, तर वेगळे काही अद्भुत करण्याची गरज उरत नाही. 'बुद्ध की मार्क्स?' या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विचार, संघटन आणि सामाजिक परिवर्तनाचा हा मार्ग तर्कशुद्ध आणि स्पष्ट शब्दांत मांडलेला आहे. क्रांतीबा ज्योतिबा फुले, सम्राट अशोक आणि बाबासाहेब आंबेडकर या सर्वांनी समाजपरिवर्तन घडवले, कारण त्यांच्या विचारांना धम्म, संघटन आणि दिशेची जोड होती. आज गरज आहे नेतृत्व व्यक्तीपूजेवर नव्हे, तर प्रक्रियेवर उभे करण्याची.

४. अहंभावावर मात : संघटन संस्कृतीची खरी कसोटी

संघटन तुटण्यामागे सर्वात मोठा अडथळा कोणता असेल, तर तो अहंभाव. माझ्याशिवाय काहीच होणार नाही, माझेच मत अंतिम या भावनेतून संघटना उभ्या राहत नाहीत; त्या फुटतात.द्धांनी स्पष्ट सांगितले होते, अहंकार हा दुःखाचा मुळ आहे.जर आपण स्वतः ला बौद्ध धम्मीय म्हणवून घेत असू, तर अहंभावावर मात करणे ही किमान अपेक्षा आहे. खरे संघटन तिथेच घडते, जिथे पदांपेक्षा प्रक्रिया महत्त्वाची असते आणि व्यक्तीपेक्षा उद्दिष्ट मोठे असते. ही संस्कृती वरून खाली रुजते. म्हणूनच सामाजिक नेते, राजकीय नेते आणि भिक्खु संघ या सर्वांनी आत्मपरीक्षण करणे अत्यावश्यक आहे.

५. सोशल मीडियापासून प्रत्यक्ष संघटनाकडे

आज बौद्ध समाज जागरूक आहे, पण मोठ्या प्रमाणावर डिजिटल पातळीवर. व्हॉट्सप ग्रुप, फेसबुक पोस्ट, प्रतिक्रिया हे सर्व दिसते. पण वास्तव स्वीकारावे लागेल. व्हॉट्सप ग्रुप म्हणजे संघटना नाही आणि पोस्ट म्हणजे कृती नाही .सोशल मीडिया हे उपयुक्त साधन आहे. त्याचा वापर बैठकींसाठी, अभ्यास साहित्य शेअर करण्यासाठी, स्थानिक कामाचा अहवाल देण्यासाठी केला जाऊ शकतो. पण प्रत्यक्ष भेटी, चर्चा, काम आणि सातत्य यांना तो पर्याय ठरू शकत नाही.

६. राजकीय भान : मत म्हणजे ताकद

बौद्ध समाज मत देतो. हे निर्विवाद सत्य आहे. पण प्रश्न असा आहे की त्या मताची किंमत ठरते का?मत म्हणजे कृपा नाही. मत म्हणजे सौदा नाही. मत म्हणजे राजकीय देवाणघेवाण. संघटनाशिवाय मत केवळ संख्या राहते. संघटनासह मत ताकद बनते. संघटनाशिवाय मत विकत घेतले जाते; संघटनासह मत अटी ठरवते. ही जाणीव समाजमनात रुजवणे अत्यावश्यक आहे.

७. पुढची दिशा : काय शक्य आहे?

उपाय अवघड नाहीत, पण त्यासाठी संयम, अभ्यास आणि सातत्य आवश्यक आहे.

* नियमित राजकीय व वैचारिक अभ्यासवर्ग
* स्थानिक पातळीवर लहान पण टिकाऊ संघटना
* पदांऐवजी कार्यकेंद्रित रचना
* नेतृत्व प्रशिक्षण
* बूथ-स्तरावर प्रत्यक्ष संवाद

या गोष्टी एका निवडणुकीत घडणार नाहीत. पण त्या आजपासून नाही तर आता पासून सुरू होऊ शकतात.

आजचे छोटे प्रयत्न उद्याच्या पिढीसाठी मोठी राजकीय ताकद ठरू शकतात. प्रश्न इतकाच आहे! आपण ती ताकद घडवण्यासाठी आज काही ठोस पावले उचलतो आहोत का?!

संख्या, इतिहास, विचार आणि वारसा
हे सगळे आपल्याकडे आधीपासूनच आहे.
मात्र संघटन संस्कृती, संयम आणि दीर्घकालीन दृष्टी
ही घडवायची प्रक्रिया आहे.
खरी लढाई संख्या जमवण्याची नाही,
तर त्या संख्येला दिशा देण्याची आहे.
इतिहास आपल्याला मार्ग दाखवतो;
पण त्या मार्गावर चालायचे की नाही,
हा निर्णय आपलाच असतो.
आणि हीच पुढची चर्चा आहे.

**प्रा. (डॉ.) छाया मित्तर,**
**प्राचार्या (निवृत्त)**
**संस्थापक** KIY Education
YouTube Channel
**९७७३४१५४६९**

# अंकुर स्वयंसेवी संस्था व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने महिला मेळावा संपन्न

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील कानडीमाळी येथे अंकुर स्वयंसेवी संस्था केज व कोरो इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक लीडर तसलीम इनामदार यांच्या अध्यक्षतेखाली महिला मेळावा संपन्न झाला आहे.स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलांचा सहभाग याविषयी कृती कार्यक्रम घेण्यात आला.




प्रमुख पाहुणे म्हणून केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा डॉ. सौ. सीताताई बनसोड, नगरसेविका पदमीनआक्का शिंदे, सुषमा राऊत, शामल राऊत,संगीता राऊत,गिरीजा राऊत, छाया राऊत,उमा बनसोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले,माता जिजाऊ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून संविधानाच्या प्रास्ताविकेचे वाचन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांचे आयोजकांच्या वतीने शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी महिलांना मार्गदर्शन करताना नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई म्हणले की, महिलांना स्वतः म्हणजेच सेल्फ आपली आवड, निवड व स्वतः वर प्रेम करणे,आपले नेतृत्व विकसित करणे,एकमेकींचा आदर करणे इत्यादी विषयी मोलाचे मार्गदर्शन केले.

तसलीम इनामदार यांनी म्हटले की, गावच्या विकासात महिलांचा सहभाग आणि एकजूट स्थानिक स्वराज्य संस्थेत महिलाचे नेतृत्व वाढले पाहिजे याविषयी चर्चा केली.

हा कार्यक्रम कृतीयुक्त होता, महिला आनंदी राहिली पाहिजे, तिने स्वतः साठी जगले पाहिजे, महिलांची संगीत खुर्ची घेण्यात आली.महिलांनी आनंद उत्सव साजरा केला लोकशाही उत्सव साजरा केला.

कोरो इंडियाच्या रुक्मिणी नागापुरे यांनी महिलांना मार्गदर्शन केले तसेच महिलांनी कानडी माळी, गोपाळपूर वस्ती, गाव नकाशा सामूहिक पणे काढला. तिळगुळ समारंभ एकल महिला, सर्वांसाठी साजरा केला.

यावेळी कानडी माळीचे सरपंच अशोक राऊत उपसरपंच बाळासाहेब राऊत यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य,कानेश्वर महाविद्यालयाचे शिक्षक वृंद यांचे मोलाचे सहकार्य लाभले. स्थानिक सावित्रीबाई फुले महिला मंडळाच्या महिला बचत गटाच्या महिला ग्रामस्थ व

अंकुर संस्थेच्या अनिता कांबळे उपस्थित होत्या.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालय गांवासाठी दिशादर्शक-सरपंच अंजना गायकवाड

केज/प्रतिनिधी□दिनांक २ ६ जानेवारी २०२६ रोजी ७७ वा भारतीय प्रजासत्ताकदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. तसेच १४ ते २८ जानेवारी २०२६ मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त ग्रंथप्रदर्शन व इतर कार्यक्रम घेण्यात आले.




सर्वप्रथम प्रजासत्ताक दिनानिमित्त डॉ. राजेंद्र प्रसाद, पंडीत जवाहरलाल नेहरू, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला सरपंच सौ. अंजना गोविंद गायकवाड, ग्राम पंचायत अधिकारी डी. एस. सरवदे व ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, महारास्यातील सुप्रसिद्ध वक्ते व परखड व्याख्याते प्राचार्य, डॉ. वसुदेव( बप्पा ) गायकवाड यांच्या हस्ते पुजन व वंदन करण्यात आले. तसेच ग्रंथप्रदर्शन व वक्तृत्व स्पर्धा, गीतगायन स्पर्धा, काव्यवाचन, ग्रंथवाचन प्रश्नमंजुषा, अंताक्षरी, परिसंवाद, चर्चासत्र इत्यादी विविध कार्यक्रम घेण्यात आले.

सर्वप्रथम मार्गदर्शन करताना सरपंच सौ.अंजना गायकवाड यांनी मागदर्शन केले. स्वानंद सार्वजनिक वाचनालय गांवासाठी दिशादर्शक व मार्गदर्शक असल्याचे प्रतिपादन सरपंच अंजना गायकवाड यांनी केले. तर स्वानंद सार्वजनिक वाचनालय हे ग्रामीण महाराष्ट्राचे प्रेरणास्रोत असल्याचे प्रतिपादन ग्रामपंचायत अधिकारी डी. एस. सरवदे यांनी केले. यावेळी माजी उपसरपंच अशोक भोगजकर, शिवाजी नाना गायकवाड, गोविंद गायकवाड, निलेश गायकवाड व इतरही मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

ग्रंथ प्रदर्शनालाही सरपंच, उपसरपंच, माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्यासह रामेश्वर गायकवाड, तुकाराम गायकवाड, शिवाजी गायकवाड, चंद्रकांत गायकवाड, बबन पोळ, किसन जोगदंड, ज्ञानेश्वर गायकवाड, कमलाकर साबळे, देविदास गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, भाऊसाहेब गायकवाड, बालासाहेब गायकवाड, नारायणभाऊ गायकवाड, महेश गायकवाड सुंदरअप्पा गायकवाड, कालीचरण गायकवाड, रामराजे गायकवाड, माणीक बप्पा गायकवाड, रामराव तात्या गायकवाड, रावसाहेब जाधव, ऑपरेटर विजय थोरात, नागेश्वर वैरागे विठ्ठल गावरस्कर, एस. के. वैरागे, हरिदास गायकवाड, श्रीधर गायकवाड, पांडुरंग गायकवाड, वामन गायकवाड, रामदास राऊत, महादेव राऊत, संजय सोनवणे, आरुण गायकवाड, वेदिका गायकवाड, दिव्या साबळे, विरा सोनवणे, कल्याणी घोगले, मयुरी गायकवाड, सुशांत सौदागर, स्वरा गायकवाड, शौर्य गायकवाड, रामकृष्णतात्या गायकवाड, बालासाहेब गायकवाडयांच्यासह विद्यार्थी - विद्यार्थीनी, वाचक, युवक, जेष्ठ नागरीक यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

अध्यक्षीय समारोप डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड यांनी केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुत्रचलन व आभारप्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद गायकवाड यांनी केले.

त्यानंतर दिवसभर ग्रंथ प्रदर्शनासह वक्तृत्व स्पर्धा,गीतगायन स्पर्धा, अंताक्षरी स्पर्धा, शब्दकोडी स्पर्धा, ग्रंथवाचन स्पर्धा, परिसंवाद, चर्चासत्र, विविध विजेत्यांना पुरस्कार वितरण इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. विविध स्पर्धेत मोठ्या संख्येने विद्यार्थी - विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

# जनसामान्यांच्या मनात घर केलेला उमदा नेता महाराष्ट्राने गमावला - माजी आमदार धिरज विलासराव देशमुख

महाराष्ट्राची आजची सकाळ अत्यंत दुःखद आणि धक्कादायक वृत्ताने झाली. बारामती येथे झालेल्या विमान अपघाताचे वृत्त खोटे ठरावे, असेच आपल्या सर्वांना वाटत होते. पण, मनाला चटका लावणारे वृत्त ऐकावे लागले.

लोकप्रिय नेते, राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांच्या निधनाने महाराष्ट्राला घडविण्यासाठी धडपडणारे एक शिस्तप्रिय नेते व विकासाची दूरदृष्टी असलेले कार्यतत्पर नेते आपण गमावले आहे. या घटनेने राजकारणीतील एका लखलखत्या व धाडसी पर्वाचा अंत झाला आहे.महाराष्ट्राच्या राजकारणावर पकड असलेले अजितदादा पवार हे एक कणखर नेते, स्पष्टवक्ते, अतिशय कर्तबगार, धडाडीचे, प्रचंड कार्यक्षम असलेले नेते होते. प्रत्येक विषयात त्यांचा सखोल अभ्यास होता. १९८२ मध्ये त्यांनी राजकारणात प्रवेश केला. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी अनेक पदे भूषवली. ही प्रत्येक पदे त्यांनी जनतेच्या विकासासाठी वापरली. एखादा शब्द दिला तर तो पूर्ण करणार, ही त्यांची ख्याती होती. त्यांनी शब्द दिला आणि तो पूर्ण झाला नाही, असे कधीच घडले नाही. त्यामुळे सर्व पक्षातील नेत्यांशीही त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते. सत्ता असो किंवा नसो, ते मोठ्या तळमळीने लोकांसाठी काम करायचे. त्यांच्याकडे पाहून अनेकजण राजकारणात आले. त्यांची उणीव कधीही न भरून येणारी आहे. त्यांना मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

अशा शब्दांत माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी दिवंगत नेते अजित पवार यांना श्रध्दांजली अर्पण केली आहे.

# एका धडाडीच्या पर्वाचा करुण अंत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार: शब्दाचा पक्का

बारामतीच्या मातीत विसावलेली महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवारांची अखेरची झेप एका झंझावाती नेतृत्वाचा शेवट करून गेली. पहाटेपासून कामाला लागणारा 'रिझल्ट ओरिएंटेड' नेता, तिजोरीवर वित्तीय शिस्त लावणारा अर्थमंत्री आणि शब्दाचा पक्का 'दादामाणूस' म्हणून त्यांनी उमटवलेला ठसा कधीही पुसता येणार नाही. त्यांच्या जाण्याने प्रशासकीय वज्रमूठ आणि विकासाचा पहाडी आवाज कायमचा शांत झाला आहे.

भावपूर्ण श्रद्धांजली!

२८ जानेवारी २०२६ ची ती सकाळ महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासात एका भीषण आघाताची नोंद करून गेली. बारामती विमानतळावर धावपट्टीच्या अगदी जवळ, सकाळी ८ वाजून ४८ मिनिटांनी 'तढडडघ'' या क्रमांकाचे लिअरजेट ४५ विमान कोसळले आणि क्षणात आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. या भीषण अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित अनंतराव पवार ऊर्फ 'दादा' यांचे निधन झाले. ज्या मातीने त्यांना घडवले, ज्या बारामतीला त्यांनी जागतिक नकाशावर नेले, त्याच मातीत त्यांच्या आयुष्याची अखेरची विमानझेप विसावली.

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार यांच्या जाण्याने केवळ एका नेत्याचा अंत झाला नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एका 'संस्थेचा' अंत झाला आहे. व्यक्तीपेक्षा अधिक प्रभावी ठरणारे त्यांचे नेतृत्व, प्रशासनावर असलेली वज्रमुठ आणि शब्दाची पक्की विश्वासार्हता ही त्यांची ओळख आता केवळ स्मृतींच्या कप्प्यात उरली आहे.

**प्रशासकीय शिस्तीचा 'नंदीग्राम'**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार म्हणजे केवळ एक नाव नव्हते, तर ती गतीमान प्रशासनाची एक 'ब्रँड' होती. सकाळी साडेसहा-सात वाजता पुण्याच्या वा राज्याच्या कानाकोपऱ्यात जेव्हा एखादा प्रोजेक्ट तपासण्यासाठी दादा हजर असायचे, तेव्हा ते फक्त अधिकारीच नव्हे, तर पत्रकारांनाही घड्याळाच्या काट्यावर चालवायचे. अजितदादांच्या राजकीय प्रवासात 'वक्तशीरपणा' हा त्यांचा सर्वात मोठा दागिना होता.

अर्थमंत्री म्हणून त्यांनी राज्याच्या तिजोरीवर जी वित्तीय शिस्त लावली, ती अभूतपूर्व होती. जे काम होऊ शकते ते होईल आणि जे होणार नाही ते स्पष्टपणे तोंडावर सांगण्याची निर्भीडता हे त्यांच्या नेतृत्वाचे गमक होते. लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख यांनी त्यांना श्रद्धांजली वाहताना म्हटल्याप्रमाणे, प्रशासनावरील त्यांची पकड इतकी मजबूत होती की, मंत्रालयातील फाईल्सना गती देण्यासाठी दादांचा एक फोन पुरेसा असायचा.




**१९९१ ते २०२६: बारामती ते राज्यव्यापी झेप**

२२ जुलै १९५९ रोजी अहमदनगरच्या देवळाली प्रवरा येथे जन्मलेल्या अजितदादांचा राजकीय प्रवास १९८२ मध्ये सहकारी संस्थांमधून सुरू झाला. १९९१ मध्ये ते पहिल्यांदा बारामतीतून लोकसभेवर गेले, पण काका शरद पवार यांच्यासाठी त्यांनी ती जागा आनंदाने सोडून दिली. तिथून सुरू झालेली त्यांची ही वाटचाल सलग सातवेळा आमदार आणि तब्बल पाच वेळा उपमुख्यमंत्री पदापर्यंत पोहोचली.

त्यांचा राजकीय प्रवास हा वारशातून मिळालेला असला, तरी तो टिकवणे आणि वाढवणे हे त्यांच्या स्वतः च्या कष्टाचे फळ होते. पुणे जिल्हा बँकेपासून ते राज्याच्या अर्थमंत्रालयापर्यंत त्यांनी सत्तेचा वापर हा 'कामासाठी' केला. पिंपरी-चिंचवड शहराचा झालेला कायापालट हे त्यांच्या कामाच्या धडाडीचे जिवंत स्मारक आहे.

**वाद, विरोध आणि वास्तववादी नेता**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवारांचे व्यक्तिमत्त्व वादांपासून कधीच अलिप्त राहिले नाही. मग ते सिंचन घोटाळ्याचे आरोप असोत किंवा त्यांची काही वादग्रस्त विधाने; पण दादांनी नेहमीच 'ताकाला जाऊन भांडं लपवणे' हा प्रकार केला नाही. त्यांनी चुकांची किंमत मोजली आणि पुन्हा फिनिक्स पक्षासारखी झेपही घेतली.

२०१९ चा तो पहाटेचा शपथविधी असो वा २०२३ मध्ये शरद पवारांपासून वेगळे होऊन सत्तेत सामील होण्याचा निर्णय; अजितदादांच्या राजकारणामागे 'सत्ता' मिळवण्यापेक्षा 'काम करण्याची संधी' मिळवणे हेच मुख्य सूत्र होते. भाजपसोबत गेल्यावर त्यांनी आपली प्रतिमा बदलण्याचा प्रयत्न केला, 'गुलाबी जॅकेट' घातले, पण त्यांच्या स्वभावातील रोखठोकपणा कधीच बदलला नाही. राजकीय समीकरणांच्या पलीकडे जाऊन त्यांनी 'रिझल्ट ओरिएंटेड' नेता ही आपली प्रतिमा अधिक ठळक केली.

**शेतकरी, पाणी आणि विकास: एक अतूट त्रिसूत्री**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजितदादांच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी नेहमीच ग्रामीण महाराष्ट्र राहिला. पाणी व्यवस्थापन आणि सिंचन या विषयांत त्यांना असलेली गती आणि रस वाखाणण्याजोगा होता. कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या माध्यमातून त्यांनी अनेक प्रकल्प मार्गी लावले. बस वा वाहने गरागरागरा फिरत... अशा शैलीत रिंग रोडचे महत्त्व पटवून देणारे दादा हे आधुनिक विकासाचे पुरस्कर्ते होते. शेतकरी पुत्राचे दुःख त्यांना ठाऊक होते, म्हणूनच अर्थसंकल्प मांडताना त्यांनी नेहमीच कृषी क्षेत्राला झुकते माप दिले.

**सहृदयी 'दादामाणूस' आणि कौटुंबिक दुःख**

कठोर प्रशासकाच्या पडद्याआड एक संवेदनशील माणूस दडलेला होता. दिलीप वळसे पाटलांच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी स्वतः रुग्णालयात बसून फोन उचलणारे अजित पवार असोत, किंवा चित्रातले आपले 'ध्यान' पाहून त्यावर मिश्किल टिप्पणी करणारे दादा असोत; त्यांचे हे रूप लोभस होते.

आज त्यांच्या निधनाने शरद पवार आणि प्रतिभा पवार यांच्यावर वयाच्या या टप्प्यावर दुःखाचा जो डोंगर कोसळला आहे, त्याची कल्पनाही करवत नाही. अजितदादांच्या आई आशा पवार यांच्यासाठी तर ही हानी कधीही न भरून येणारी आहे. एका बाजूला राजकीय संघर्ष असले तरी, पवार कुटुंबातील हे बंध या दुःखाच्या प्रसंगी पुन्हा एकदा हेलावून टाकणारे ठरले आहेत.

**वारसा आणि शेवटची वाटचाल**

उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री माननीय अजित पवार गेल्याने महाराष्ट्राच्या राजकारणात जी पोकळी निर्माण झाली आहे, ती कधीच भरून निघणार नाही. आज असा नेता मिळणे कठीण आहे, जो सकाळी ६ वाजता कामाला लागतो आणि रात्री १२ वाजेपर्यंत फाईल्सचा निपटारा करतो. त्यांनी पिंपरी-चिंचवड, बारामती आणि पुण्याच्या रूपात जो विकासाचा वारसा ठेवला आहे, तोच त्यांची खरी स्मृती असेल.

मृत्यूने त्यांची वाटचाल थांबवली असली तरी, त्यांनी काळावर उमटवलेला ठसा कधीही पुसता येणार नाही. राजकारणात 'गॉडफादर' नसताना किंवा असलेल्या सावलीतून स्वतःचे अस्तित्व निर्माण करणे काय असते, हे त्यांनी जगाला दाखवून दिले.

नेतृत्व माणसाने संपत नाही, ते काळावर ठसा उमटवते. अजितदादांच्या रूपाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धगधगते कुंड शांत झाले आहे. त्यांच्या निधनाने केवळ एक उपमुख्यमंत्री गेला नाही, तर 'कामाची भाषा' बोलणारा एक पहाडी आवाज निमूट झाला आहे.

दादा आता तुम्ही रिचेबल राहणार नाहीत ही कायम खंत राहील,

भावपूर्ण श्रद्धांजली!

**लेखक - राहुल हरिभाऊ इंगळे पाटील मोबाईल ९८९०५७७१२८**

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.